# आंतरराष्ट्रीय युवक महोत्सव २०१९-२०

अखिल भारतीय विश्वविद्यालय संघ आणि कुरुक्षेत्र विद्यापीठ, कुरुक्षेत्र ( हरियाणा ) यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २४ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी २०१९ या कालावधीत १३ व्या आंतरराष्ट्रीय युवक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. ३४ व्या राष्ट्रीय युवक महोत्सवात विविध कलाप्रकारातील सुवर्णपदक विजेत्या कलाकारांना भारत देशाचे नेतृत्व करण्यासाठी १३ व्या आंतराराष्ट्रीय युवक महोत्सवात संधी मिळाली होती. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा सुगम गायक सुवर्णपदक विजेता विद्यार्थी कु. हर्षद गोळेसर यास आंतरराष्ट्रीय युवक महोत्सवात सहभागी होण्याचा मान मिळाला. या युवक महोत्सवात भारतासह नेपाळ, बांग्लादेश, अफगाणिस्तान, श्रीलंका या देशातील देखील विविध विद्यापीठ सहभागी झाले होते. हर्षद गोळेसर यांनी ‘ सुगम गायन ’ कलाप्रकाराचे उत्तम सादरीकरण करीत रसिकांची मने जिंकली.







